नि. फौ. ख. क्र.७३/२०२२ **निशाणी क्र.४३**

**सरकार तर्फे साक्षीदार क्र.४ यांचा जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,**

नाव – गणेश विक्रम शेंद्रे

वय – ३७ वर्षे, व्यवसाय – शेती

पत्ता – रा. माजलगांव, ता. माजलगांव, जि. बीड.

**सरकारतर्फे सरकारी वकिल श्री. ए. डी. साखरे यांचेमार्फत सरतपास दु.४.०० वा. सुरुः**

**१.** सदर घटना ही दि.२५.०९.२०२२ रोजी सकाळी ७.३० वा. आमचे परडी येथील राहते घरी घडली होती. त्या दिवशी मला माझा भाऊ लक्ष्मण विक्रम शेंद्रे यांचा फोन आला व ते मला असे म्हणाले की, तु गावाकडे ये महेश, मिनाक्षी आणि ज्ञानोबा हे मला शिवीगाळ करीत आहेत. त्या दिवशी दस–याची साफसफाई करीत असताना आमच्या घरावरी पत्रे थोडे पाठीमागील बाजुस सरकले होते या कारणावरुन भांडण झाले होते. महेश ने माझ्या भावाला शिवीगाळ केली, त्यानंतर त्याने घरातुन हातोडा आणुन माझ्या भावाच्या डोक्यात मारला आहे. माझ्या भावाने मला असे सांगितले होते की, मिनाक्षी ने त्याचे हात धरले आणि ज्ञानोबाने त्याच्या पाठीत दगड मारला.

२. मला अशी माहिती मिळाल्यामुळे मी परडी गावाकडे आलो होतो. मी गावाकडे पोहोचण्यापुर्वीच गोरख शेंद्रे आणि अशोक शेंडगे यांनी माझ्या भावाला वडवणीच्या सरकारी दवाखान्यात नेले आहे, त्यामुळे मी स्वतः वडवणी येथे आलो. वडवणीला आल्यानंतर मी स्वतः, माझा भाऊ लक्ष्मण तसेच गोरख आणि अशोक आम्ही सर्वजण पोलीस स्टेशन वडवणी येथे गेलो होतो. त्या नंतर पोलीसांनी आम्हाला एक पत्र देवुन दवाखान्यात जाण्यासाठी सांगितले. त्यानंतर लक्ष्मण यांनी वडवणीच्या सरकारी दवाखान्यात प्रथोमपचार घेतले. त्यानंतर वडवणीच्या दवाखान्यात आम्हाला पत्र देवुन बीडच्या सरकारी दवाखान्यात पाठविले होते. बीड च्या सरकारी दवाखान्यात माझा भाऊ दोन दिवस भरती होता. त्यानंतर माझ्या भावाने वडवणी पोलीस स्टेशनला फिर्याद दिली आहे. मी सर्व आरोपींना ओळखतो, ते आज रोजी न्यायकक्षात हजर आहेत.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. टी. ए. शेख यांच्यामार्फत</u>**

**३.** हे म्हणणे खरे आहे की, आमच्या भावा–भावांमध्ये वाटण्या झाल्यानंतर लेकरांच्या शिक्षणासाठी मी माजलगाव येथे राहत आहे. फिर्यादी लक्ष्मण माझा मोठा भाऊ असून मी भावाचे ऐकतो. हे म्हणणे खरे आहे की, मला घटनेची माहिती फोन वरुन मिळालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटना मी प्रत्यक्ष पाहिलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी परडी गावात पोहोचण्यापुर्वीच माझा भाऊ वडवणी पो.स्टेशनकडे निघाला होता. हे म्हणणे खरे आहे की, माझा भाऊ लक्ष्मण आणि माझी भेट वडवणी येथेच झाली आहे. माझा भाऊ लक्ष्मण आणि भेट पो.स्टेशन वडवणी च्या बाहेरील रस्त्यावर झाली आहे. माझे शिक्षण एम.ए. बी.एड पर्यंत झाले आहे. माझ्या भावाला मारहाण झाल्यामुळे आणि तो रक्तबंबाळ झाला असल्यामुळे पोलीसांना आम्ही लगेच तक्रार घ्या अशी विनंती केली होती.

| | | |
|---|---|---|
| **प्रश्न** | – | तुम्ही विनंती केल्यानंतरही पोलीसांनी तुमची तक्रार लगेच नोंदवुन घेतली नाही ? |
| **उत्तर** | – | पोलीसांनी आम्हाला अगोदर प्रथोमचार घेवुन या नंतर तुमची एफ.आय.आर. घेतो असे सांगितले होते. |

| | | |
|---|---|---|
| **प्रश्न** | – | वडवणीच्या दवाखान्यात प्रथोमपचार घेतल्यानंतर तुम्ही लगेच पुन्हा पो.स्टेशनला येवुन तक्रार देण्याचा प्रयत्न केला होता का ? |
| **उत्तर** | – | वडवणीच्या दवाखान्यातुन आम्हाला बीडच्या दवाखान्यात जाण्यासाठी पत्र दिले होते. माझ्या भावाच्या डोक्याला जास्त मार लागला असल्यामुळे आम्ही अगोदर बीडच्या सरकारी दवाखान्यामध्ये गेलो. |

४. हे म्हणणे खरे आहे की, वडवणी पो.स्टेशन आणि वडवणीचे एस.टी. स्टँड ही दोन्ही ठिकणे जवळ–जवळ आहेत. मी माझ्या भावासोबत बीडच्या दवाखान्यात गेलो होतो. बीडच्या सरकारी दवाखान्याजवळ असलेल्या पोलीस चौकीमध्ये आम्ही तक्रार दिली नाही. पोलीसांनी माझा जबाब फिर्याद देतेवेळी नोंदवुन घेतला आहे, त्यानंतर पोलीसांनी माझा जबाब नोंदविलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या घरासमोर एक ओट्यासारखी भिंत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या घरासमोरची ओट्यासारखी भिंत माझ्या भावाच्या डोक्याला लागल्यामुळे भावाला जखम झालेली आहे. हे म्हणणे खरे

नाही की, आरोपींच्या घराजवळची बोळीची जागा हडप करण्याच्या उद्देशाने माझ्या भावाने खोटी तक्रार दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या भावाला कोणताही मार लागलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासाच्या वेळी कथन केलेल्या सर्व बाबी खोटया सांगितलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझा भाऊ लक्ष्मण विक्रम शेंद्रे यांच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष दिली आहे.

उलटतपास दु.४.२८ वा. पुर्ण.

फेरतपास नाही.

**दिनांकः– ०४/०२/२०२६**

| **समक्ष** | **श्रवणोत्तर निवेदन स्विकृत** |
|---|---|
| sd/– | sd/– |
| **(विष्णु द. गिते)** | **(विष्णु द. गिते)** |
| प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, |
| वडवणी, जि. बीड. | वडवणी, जि. बीड. |